# घटक १ (ब) सारांशलेखन

अनुक्रमणिका

**१.० उद्दिष्टे**

**१.१ प्रास्ताविक**

**१.२ शब्दार्थ**

**१.३ सारांशलेखन : मंत्र आणि तंत्र**

१.३.१ नमुना उताऱ्याचे सारांशलेखन कौशल्य
१.३.२ लक्षात ठेवावयाच्या ठळक गोष्टी
१.३.३ नमुना उताऱ्याचे सारांशलेखन

**१.४ नमुना उत्तरे**

**१.५ सारांश**

**१.६ सरावासाठी स्वाध्याय**

**१.७ अभ्यासासाठी अधिक वाचन**

## १.० उद्दिष्टे

आपण याच घटकात 'भाषांतर' या प्रगत भाषिक कौशल्याचे अध्ययन केले. आता आपल्याला सारांशलेखन या आणखी एका प्रगत भाषिक कौशल्याचा अभ्यास करावयाचा आहे.

या घटकाचे काळजीपूर्वक अध्ययन केल्यानंतर तुम्ही,

- कोणत्याही उताऱ्याचा सुमारे एकतृतीयांश शब्दांत संक्षेप करण्याची कला आत्मसात कराल.
- सारांश लेखनाचे स्वरूप व महत्त्व तुम्ही स्पष्ट करू शकाल.
- आपण जे वाचतो त्याचे सारग्रहण किंवा आकलन करण्याची शक्ती अवगत झाल्यामुळे तुमच्या वाचनाची गती वाढेल.

## १.१ प्रास्ताविक

- 'सारांशलेखन' या शब्दाला पर्याय म्हणून 'सारग्रहण' असाही शब्द योजतात.
- कधीकधी सारांशलेखन सहज करता यावे म्हणून प्रश्न विचारलेले असतात. या प्रश्नांच्या उत्तरांच्या आधारे सारांश सांगता येतो.
- आपल्या प्रस्तुत अभ्यासपुस्तकात (Study text) प्रत्येक घटकाचे अध्ययन झाल्यावर 'सारांश' दिला आहे.
- कुणी एखादा विचार विस्ताराने सोदाहरण समजावून दिला किंवा एखाद्याने वर्णन केले किंवा एखाद्याने विशिष्ट आशय मांडला तर आपल्याला त्याचा संक्षेप करता आला पाहिजे. मूळ आशय, विचार किंवा वर्णन मोजक्या शब्दांत व्यक्त करता आले पाहिजे. आपले म्हणणे थोडक्यात मांडण्याची किंवा दुसऱ्याने जे म्हटले ते थोडक्यात मांडण्याची अत्यंत गरज आहे. तुम्ही कोणत्याही क्षेत्रात असा, तुम्हाला संक्षेपाने विचार मांडण्याची, मोजक्या शब्दात म्हणणे मांडण्याची कला आत्मसात केली पाहिजे. मात्र संक्षेप करताना मूळ गाभ्याला धक्का पोचता कामा नये. आजच्या गतिमान जगात संक्षेप करण्याची कला आत्मसात करण्याशिवाय दुसरे गत्यंतर नाही.
- सारांशलेखन म्हणजे मूळ उताऱ्यातील आशयाचा संक्षेप किंवा सारांश. सारांशलेखन हे मूळ उताऱ्यातील एकूण शब्दसंख्येच्या एकतृतीयांश शब्दांत करण्याची पद्धत आहे. उताऱ्याची संख्या ३०० शब्द इतकी असेल तर सारांश १०० शब्दांत मांडता आला पाहिजे.

## १.२ शब्दार्थ

सारांशलेखन –उताऱ्याचे आकलन करून ते संक्षेपाने लिहणे.
शीर्षक –उताऱ्याला द्यावयाचा समर्पक मथळा.
कच्चा मसुदा –उताऱ्यातील मुख्य मुद्यांचे टिपण.
मध्यवर्ती कल्पना –प्रत्येक उताऱ्यात किंवा परिच्छेदात एक गाभा असतो.
मूळ उतारा –सारांशलेखनासाठी किंवा सारग्रहणासाठी दिलेला उतारा.

## १.३ सारांशलेखन : मंत्र आणि तंत्र

सारांश लेखन हे प्रगत भाषिक कौशल्य आत्मसात करण्यासाठी मूळ उताऱ्यांचे आकलन नीट झाले पाहिजे. लेखकाचे प्रतिपादन समजून घेऊन त्यातील मुद्दे विचारात घ्यावे आणि मग आपल्या शब्दांत सारांश लिहावा. दिलेल्या उताऱ्यातील वाक्ये जशीच्या तशी लिहून काढणे योग्य नाही.

### १.३.१ नमुना उताऱ्याचे सारांशलेखन कौशल्य

सत्य विचार नेहमी तटस्थ, निरपेक्ष असतो. असा जो सत्यनिष्ठ विचार आहे, या विचाराची आज आपल्या देशाला फार मोठी गरज आहे. याचे कारण असे आहे, की विचार करण्याचे जबाबदारीचे काम आता जगातील जवळजवळ सगळ्या माणसांनी सोडून दिले आहे. व्हॉल्टेअरचे एक मोठे सुंदर वाक्य आहे. त्याने असे म्हटले आहे, की माणसाला देवाने बुद्धी दिली आणि माणसाने या त्याच्या चुकीबद्दल सूड उगविण्याचे ठरविले. तू आम्हांला बुद्धी दिलीस, ठीक आहे; आम्ही निदान एवढे तरी करू, की ती वापरणार नाही, तिचा उपयोग करणार नाही आणि आज आपल्याला असे दिसून येते, की माणसाचे वैशिष्ट्य बुद्धी आहे, तरी जे बुद्धिमान लोक आहेत त्यांचा बुद्धीवर कमीत कमी विश्वास आहे. माणसाचा सगळ्यात कमी जर विश्वास कशावर असेल

तर बुद्धीवर आहे. शिपायाचा तलवारीवर विश्वास आहे. सत्ताधाऱ्यांचा सत्तेवर, तख्तावर, सिंहासनावर विश्वास आहे. पण ज्याच्याजवळ बुद्धी आहे त्याचा बुद्धीवर मुळीच विश्वास नाही. तो एखाद्या वेळी बुद्धीचा उपयोग तलवारीची स्तोत्रे गायला करतो. अनेकदा धनाचा महिमा सांगायला बुद्धीचा उपयोग करतो आणि सत्ताधाऱ्याचे वैतालिक तर अनेक साहित्यिक आहेत, अनेक बुद्धिमंत आहेत. बुद्धिमंताचा बुद्धीच्या शक्तीवर विश्वास नाही. माणसाची मुख्य शक्ती बुद्धी हीच आहे. विचार हीच माणसाची शक्ती आहे. या निष्ठेची आज आवश्यकता आहे. ही निष्ठा म्हणजेच लोकनिष्ठा. बुद्धीचा उपयोग जो करू शकतो, बुद्धीच्या शक्तीवर ज्याचा विश्वास आहे, तोच लोकनिष्ठ. हे लोकतंत्राचे, लोकशाहीचे अधिष्ठान आहे.

आज आपण असे बघतो, की ज्याच्याजवळ संपत्ती आहे, धन आहे तो लोकशाहीला विकत घेण्याचा प्रयत्न करीत आहे. ज्याच्याजवळ सत्ता आहे, तो लोकशाही आपल्या स्वार्थाकरिता राबवून घेण्याचा प्रयत्न करीत आहे आणि ज्याच्याजवळ दंडुका आहे, तो लोकशाही आपल्या वळणावर कशी येईल या दृष्टीने माणसाला वळविण्याचा प्रयत्न करीत आहे. या तीन शक्तींची प्रतिष्ठा जोपर्यंत आहे तोपर्यंत औपचारिक लोकशाहीच्याऐवजी जिला आपण वास्तविक लोकशाही म्हणतो तिची स्थापना होऊ शकणार नाही.

या उताऱ्यात २६४ शब्द आहेत म्हणजे तुम्हाला सारांश लेखन ८८ शब्दांत करावयाचे आहे.

## १.३.२ लक्षात ठेवावयाच्या ठळक गोष्टी

आता सारांशलेखनासाठी महत्त्वाच्या ठळक गोष्टी लक्षात ठेवा.

१) या उताऱ्यात लेखकाने कोणता विचार मांडला आहे?
नीट वाचा. एकाग्रतेने वाचा.
म्हणजे तुमच्या लक्षात येईल की 'माणसाची खरी शक्ती बुद्धी ही आहे' हे या उताऱ्याचे मुख्य सूत्र आहे.

२) लेखकाने विचारविकासाचा क्रम कोणता ठेवला आहे? त्यासाठी मुद्दे क्रमाने मांडा. ते असे मांडता येतील–
अ) सत्यनिष्ठ विचाराची देशाला गरज आहे.
ब) माणसाने दिलेल्या बुद्धीचा उपयोग विचार करण्यासाठी करावा.
क) बुद्धीवरचा विश्वास गमावू नये.
ड) बुद्धीच्या शक्तीवर विश्वास असणारा माणूस हाच लोकशाहीचा मूलाधार.
इ) सत्ता, संपत्ती आणि दंडशक्ती यांना प्रतिष्ठा मिळाली तर लोकशाही नांदणार नाही.

३) 'सारांश'ला शीर्षक द्यायचे असेल तर मुख्य विचारसूत्र अगर मध्यवर्ती कल्पना विचारात घ्यावी. मग कोणते शीर्षक द्याल?

(१) माणसाची खरी शक्ती : बुद्धी (२) लोकशाहीचा मूलाधार (३) बुद्धीवरचा विश्वास गमावू नये.

या तीन शीर्षकांपैकी कोणते शीर्षक निवडाल? का?

४) वरील मुद्द्यांच्या आधारे कच्चा मसुदा तयार करा.

५) कच्चा मसुदा तयार केल्यामुळे 'संक्षेपा'ला अंतिम रूप देणे शक्य होते.

६) सरावामुळे कच्चा मसुदा तयार करणे सहज शक्य होते.

तुमच्या मार्गदर्शनासाठी खालीलप्रमाणे कच्चा मसुदा तयार केला आहे तो अभ्यासा.

विचार करणे हा माणसाचा धर्म आहे आणि विचारी माणसाची या देशाला फार गरज आहे. माणसाला बुद्धीची शक्ती दिली आहे तिचा उपयोग न करून कसे चालेल? बुद्धीचा उपयोग विचार समृद्ध करण्यासाठी केलाच पाहिजे. तख्त, तलवार आणि तिजोरीचे दास्यत्व बुद्धीने स्वीकारू नये. बुद्धीच्या शक्तीवर विश्वास ठेवतो तो विचारी माणूस, हा लोकशाहीचा मूलाधार आहे. पण वस्तुस्थिती अशी आहे की या देशात औपचारिक लोकशाही आहे. कारण सत्ता, संपत्ती आणि दंडशक्ती या तीन शक्तींना प्रतिष्ठा लाभली आहे. ती प्रतिष्ठा नष्ट केल्याशिवाय खरीखुरी लोकशाही नांदणार नाही.

५) हा कच्चा मसुदा आणि मूळ उतारा पुनःपुन्हा वाचा. एखादा मुद्दा सुटला आहे का बघा. अनावश्यक शब्द (विशेषणे, सर्वनामे इत्यादी), वाक्ये आली असल्यास काढा.

६) आता तुम्ही 'सारांश' अंतिम स्वरूपात लिहून वाचा.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

(क) सारांश लेखनाची कला आत्मसात का केली पाहिजे?

...........................................................................................................................

...........................................................................................................................

...........................................................................................................................

(ख) एका वाक्यात उत्तर द्या.

१) सारांश लेखन म्हणजे काय?

...........................................................................................................................

२) कच्चा मसुदा का तयार करावा?

...........................................................................................................................

३) समर्पक शीर्षक कशाला म्हणावे?

...........................................................................................................................

## १.३.३ नमुना उताऱ्याचे सारांशलेखन

आता आणखी एक उतारा दिला आहे. त्याखाली प्रश्न दिले आहेत, त्याची उत्तरे दिली आहेत. मग तुम्ही सारांश लिहून पाहा.

व्याकरण हा शब्द आपल्या सर्वांच्या पूर्ण परिचयाचा तरी आहे. अतिपरिचयाचा आहे असे म्हटले तरीही चालेल. व्याकरण हा शब्द उच्चारला आणि ज्याच्या कपाळाला आठ्या पडल्या नाहीत किंवा डोके ठणकायला लागले नाही असा माणूस विरळा. व्याकरणाचे काटेरी कुंपण ओलांडल्याशिवाय साहित्याच्या नंदनवनात प्रवेश करता येत नाही. निदान परभाषांतल्या साहित्याच्या नंदनवनात प्रवेश करता येत नाही, किंवा परभाषांतल्या साहित्याचा रसास्वाद हे दिव्य पार पाडल्यावाचून घेता येणार नाही अशी मान्यता आहे. 'ब्रह्मपदी' नाचण्यासाठी लोखंडाचे चणे खावे लागतात. भाषाप्रभुत्वासाठी खायचे लोखंडाचे चणे म्हणजे व्याकरण असेही पुष्कळांना वाटते. ते चावणे आणि पचविणे ही गोष्ट बहुतेक लोकांना इतकी कठीण वाटते की, त्यापेक्षा 'नको ती नवी भाषा' असे म्हणण्याइतकी या विषयाची धास्ती ते घेतात.

व्याकरण शिकल्याशिवाय परभाषा येणार नाही ही समजूत तर आहेच, पण स्वभाषेवरील प्रभुत्वालाही 'शुद्ध कसे बोलावे आणि शुद्ध कसे लिहावे' याचे नियम आलेच पाहिजेत, असेही मानणारे असंख्य लोक आहेत. आपण बोलतो त्या भाषेच्या स्वरूपापेक्षा आणि माहितीपेक्षा व्याकरण हे काही विशेष वेगळे आहे, असे मानले जाते. जोडे घालून देवळात जाता येणार नाही, त्याचप्रमाणे बोलायची भाषा साहित्यात वापरून चालणार नाही, असा एक जवळजवळ सर्वसामान्य समज आहे. म्हणजे आपणाकडे रूढ असणाऱ्या 'व्याकरण' या शब्दाचा अर्थ 'लिहिण्याच्या भाषेचे नियम' असा करायला हवा 'शुद्ध कसे बोलावे' हा विषय या व्याकरणाच्या कक्षेत येऊ शकत नाही.

ही लिहिण्याची भाषा बोलभाषेपेक्षा अनेक प्रकारे वेगळी असू शकेल. व्यवहारात वापरले न जाणारे अनेक शब्द तिच्यात असतील आणि व्यवहारात मान्यता मिळालेल्या अनेक शब्दांना तिच्यात मज्जाव असेल, तिच्यातील कित्येक रूपे व्यवहारात त्याच संदर्भात वापरल्या जाणाऱ्या रूपांपेक्षा वेगळी असतील, तिच्यातील वाक्यरचना आणि प्रयोग आपल्या बोलण्यात आढळणार नाहीत. सरतेशेवटी ज्या लिपीचा उपयोग करून ही भाषा लिहिली जाते तिच्यातून दर्शविले जाणारे काही ध्वनी बोलण्यात नसतील तर बोलण्यात रूढ असलेल्या काही ध्वनींना तिच्या लिपीत स्वतंत्र चिन्हे नसतील. व्याकरणाबद्दल सामान्य माणसाला जो दरारा वाटतो तो बोलभाषा आणि लेखभाषा यांच्यातल्या अंतरामुळे. (२६८ शब्द)

- या उताऱ्यात २६८ शब्द आहेत. म्हणजे तुम्हाला या उताऱ्याचा सारांश सुमारे ९० शब्दांत करावा लागेल.
- आता खाली प्रश्न दिले आहेत. त्याची उत्तरे तुम्ही लिहा.
  या उत्तरांशी पडताळून पाहा.

**१. व्याकरण का शिकले पाहिजे?**

कोणत्याही भाषेच्या अभ्यासाला व्याकरणापासूनच आरंभ होतो. भाषाध्ययनाचा व्याकरण हा आत्मा आहे.

२. **व्याकरण म्हणजे काय?**
व्याकरण म्हणजे लिहिण्याच्या भाषेचे नियम.

३. **व्याकरणाविषयी दरारा का वाटतो?**
बोलभाषा व लेखभाषा यांच्यात अंतर आहे. त्यांच्यातले वेगळेपण लक्षात घ्यावे लागते. शब्दांची रूपे, वाक्यरचना, वाक्यप्रयोग इत्यादी बाबी बोलभाषा आणि लेखभाषेत वेगवेगळ्या असतात.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

(ग) या उताऱ्याला योग्य शीर्षक द्या.

..............................................................................................................................

(घ) **जागा भरा.**

१) सारांशलेखन हे .............................................. कौशल्य आहे.
२) मूळ आशय ............................ शब्दांत व्यक्त करावा.
३) गतिमान जगात ................................................................ आत्मसात केली पाहिजे

## १.४ नमुना उत्तरे

(क) जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात माणसाला आपले म्हणणे संक्षेपाने मांडता आले पाहिजे. तसेच जे जे आपण वाचतो ते सारांश रूपाने लिहिता आले पाहिजे. त्याशिवाय आता तरणोपाय नाही.

(ख) १. सारांशलेखन म्हणजे मूळ उताऱ्याचा संक्षेप.
२. कच्चा मसुदा तयार केला म्हणजे 'सारांश'ला अंतिम रूप देणे सहज शक्य होते.
३. ज्या शब्दांतून उताऱ्याचा गाभा किंवा मुख्य विचारसूत्र सूचित होते ते समर्पक शीर्षक.

(ग) व्याकरणाच्या अभ्यासाचे महत्त्व.

(घ) प्रगत भाषिक, मोजक्या किंवा अचूक, सारांशलेखनाची कला.

## १.५ सारांश

सारांशलेखन हे प्रगत भाषिक कौशल्य आहे. आजच्या गतिमान जगात संक्षेपाने आपले म्हणणे सांगणे आणि वाचलेले अचूक शब्दांत संक्षेपाने मांडण्याची गरज आहे. म्हणून सारांश लेखनकला आत्मसात करावी.

दिलेला उतारा पुन:पुन्हा वाचावा. मनन करावे. उताऱ्याचे विचारसूत्र व मुख्य मुद्दे मांडावेत. त्यांच्या आधारे कच्चा मसुदा तयार करावा व मग एक तृतीयांश शब्दांत तो लिहावा.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

खाली दोन उतारे दिले आहेत, त्याचे सारांशलेखन करा.

(१)

मी सतत चिंतन करीत असतो, गाभा शोधीत असतो तेव्हा मला जाणवते : युवासागराला आपल्या भव्य शक्तीचे भान अद्याप झालेले नाही! या ढगांना आपल्यात लपलेल्या विद्युल्लतेचा पत्ता नाही, अंदाज नाही. या कृष्ण-मेघांना कळत नाही की करंगळीवर क्षितिज पेलणारा कृष्णसुद्धा याच वयाचा होता, याहूनही लहान होता! ज्याचे ध्यान आपल्या ध्येयाशी एकटक निगडित झाले आहे, तो युवा!

दररोज मी स्वत:ला शोधीत असतो. कधीकधी मी एकाकी असतो. जखम दिसत नाही, पण घायाळ असतो. अशा एकाकीपणात मला अंकुर फुटतात. मी स्वत:विरुद्ध माझ्यापाशीच तक्रार करीत असतो. युवा तो असतो, जो इतरांविरुद्ध नव्हे तर स्वत:विरुद्ध स्वत:जवळच तक्रारी मांडत असतो. मी ते दु:ख पाहिले. माझ्याजवळ इतकी ताकद होती, मग मी पुढे का सरसावलो नाही? माझ्यात करुणेची, प्रेमाची शक्ती होती तर काल मी पळून का गेलो? का त्या प्रसंगाला सामोरा गेलो नाही? ही अस्पृश्यता, विषमता, अज्ञान, दारिद्र्य, लाचारी

मी सहन करू शकत नाही. मग जीवनाच्या रणांगणाकडे जाताना माझी पावले का अशी रेंगाळतात? कृतीच्या क्षणी मी का माघारी वळतो? जो लाचारीने शरमिंदा होतो, तो युवा. आपल्या या लाचारीवर तो एकांतात अश्रू ढाळतो. ते क्षण त्याला बळ देत असतात, अगतिकतेच्या पलीकडे झेपावण्याचे. उषःकालापूर्वी घनदाट अंधःकार जरूर असतो पण प्रभातकाल सन्निध असल्याची चाहूल तो अंधार देत असतो. युवा तो-- जो जगातले अंधारलेले कोपरे उजळवतो. त्याचबरोबर आपल्या हृदयातला कोपराही दीप्तिमान करतो.

परिस्थितीचे लगाम खेचून जो तिला काबूत आणतो तो युवा. (पण) साहसालाही एक अट असते. लक्ष्मणरेषा आखण्याची. तरुणाईने आपल्या जीवनात ही लक्ष्मणरेषा आखून घेतली नाही म्हणून ही शक्ती विध्वंसनात, उलथापालथीत कामी येत आहे. आपल्या युवाशक्तीला त्यांनी योग्य रस्त्यावर हाकारले नाही. कधी छोटचा छोटचा प्रकल्पांत, कार्यक्रमांत, इवल्याशा क्रांतीत ती तो उधळून टाकतो. पण चहाच्या किटलीतल्या वाफेने जनतेचे रथ चालत नसतात!

आजची युवा पिढी आहे केवळ स्पेक्टेटर जनरेशन–प्रेक्षक पिढी, देखू पिढी! ती केवळ पाहते आहे–कोठे कशी क्रांती घडून येते. जेथे बांधून घ्यावे लागेल, कार्यमग्न व्हावे लागेल असे राजकारण तिला नको! कार्यक्रम असा असावा की ज्यात बांधिलकी (कमिटमेंट) सुद्धा असावी आणि सहभागही (इन्व्हॉलमेंट) असावा. जेव्हा कोणी युवक माझ्याकडे स्वाक्षरी मागायला येतो तेव्हा मी हैराण होतो. युवक तो आहे : जो इतरांपासून संदेश वा स्वाक्षरी मागीत नसतो. तो घटनांवर आणि क्षणांवर आपली स्वाक्षरी उमटवितो!

आता काय आहे, काय नाही याचे चऱ्हाट आणि रडगाणे बंद झाले पाहिजे. ती पिढी अशी आहे, हा धर्म असा आहे, सोडून द्या या गोष्टी. धर्माने दुनियेचे भले होईल यावर भरोसा ठेवायची तुमच्यावर कोणी सक्ती तर नाही ना केली? आपसात वैर करावे असे धर्म सांगत नाही. पण त्याच्याच नावावर झगडे होत आहेत.

(२)

काय स्थित्यंतर घडवले युद्धाने? कोणते नवचैतन्य त्याने नरनारींना दिले? कोणते सत्य त्याने लोकांना सांगितले की त्याच्यामुळे घरादाराचा त्याग करून सुखी संसारी माणसेदेखील संन्यासी जीवन अंगिकारायला सिद्ध झाली? जन्म, व्याधी, जरा आणि मृत्यू यांत जे दुःख भरले आहे, त्याच्या प्रत्ययातून बुद्धाचे आर्यसत्य साकारले आहे. अनेकांनी गौतमबुद्ध हा दुःखाचा उद्‌गाता, निराशेचे तत्त्वज्ञान गाणारा, म्हणून त्याला ठपका दिलेला आहे. पण जरा वर मान करा व बघा, त्या ध्यानस्थ बुद्धमूर्तीकडे. ती का निराशेची प्रतीक आहे? नाही नाही. सनातन आशेचे चिरकोमल हास्य या मूर्तीच्या ओठावर फुटलेले आहे. काळाला ते कधीही पुसता येणार नाही. त्या मूर्तीचे नेत्र अर्धे उघडे, अर्धे मिटलेले आहेत. नुकते उमलणारे कमल कोटक असावे तसे त्या कळ्यांप्रमाणेच त्याच्या नेत्रांची पुटे भरीव आहेत, गंभीर आहेत आणि स्थिरही आहेत. कळीचे फूल होते पण इथे तर पूर्ण विकसित पुष्पाची अर्धस्फुट कळी झाली आहे. नवविकसन आणि विनाश या दोन्ही अवस्थांच्या आंदोलनांना आणि कंपनांना स्थिर रूप देऊन बुद्धाच्या नेत्रांनी एका नव्याच अस्फुट दृष्टीने माणसाला जगाकडे पाहायले शिकविले. संसारात हजार सुखे असली तरी त्यात हजार भयेदेखील आहेत. संसारच मुळी क्षणभंगुर आहे आणि अनंत अशा सुखाची आशाच नाही. त्यात देव नाही आणि वेदासारखी वचनेही तुम्हांला त्या दुःखातून तारू शकणार नाहीत. मग माणसाला तारते ते काय? माणसाला तारून नेतो त्याचा आत्मप्रत्यय, त्याची विश्वाबद्दलची सत्य भावना. चराचराबद्दल व्यक्तिनिरपेक्ष प्रेम, हीच मानवी जीवनाच्या सार्थकतेची खूण. ही मैत्रीची भावना आली की माणूस सर्व दुःखांपासून मुक्त होतो. माणसाने स्वतःच्या मनावर स्वतःच नियमन करण्याचा हा महान प्रयोग गौतमाने जगाला शिकविला. त्याचा परिणाम अनेकांवर अनेक तऱ्हांनी झाला. त्यानेही कुणी सुखी झाले, कुणी दुःखीपण झाले.

## १.७ अभ्यासासाठी अधिक वाचन

**सारांश लेखना करिता वाचण्यासाठी अधिक पुस्तके :**

व्यावहारिक मराठी : संपा. कुलकर्णी–फडके–जोगळेकर, पुणे विद्यापीठ प्रकाशन.
व्यावहारिक मराठी : डॉ. कल्याण काळे व डॉ. दत्तात्रय पुंडे